महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



पोलीस आयुक्त, ठाणे यांचे कार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, ४००६०१, दूरध्वनी क्रमांक - ०२२ - २५४४३६३६
Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/गोशा/पोलीस निरीक्षक/बदली पदस्थापना/ ९७६३ /२०२६, दि.30/०६/२०२६

संदर्भ :- १) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१.
२) आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांच्या दि. ३०/०६/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

विषय :- पोलीस निरीक्षकांच्या बदली पदस्थापनेबाबत.

----oooo----

आदेश :-

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २२ न (२) मधील सुधारित स्पष्टीकरणानुसार आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना अपवादात्मक प्रकरणांमध्ये जनहितार्थ आणि प्रशासनिक निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणुन प्रदान असलेल्या अधिकारान्वये, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस निरीक्षक यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	पोलीस निरीक्षकाचे नाव	सध्याचे पदस्थापना ठिकाण	बदली पदस्थापना ठिकाण
१	अशोक आनंदराव कोळी	विठ्ठलवाडी पो.स्टे.	व.पो.नि. मध्यवर्ती पो.स्टे.
२	विक्रम गुलाबराव मोहिते	भिवंडी शहर पो.स्टे.	व.पो.नि. भोईवाडा पो.स्टे.
३	योगेश शंकरराव आव्हाड	गुन्हे शाखा	व.पो.नि. नौपाडा पो.स्टे.
४	प्रमोद सुदाम कुंभार	भोईवाडा पो.स्टे	व.पो.नि. शांतीनगर पो.स्टे.
५	ज्ञानेश्वर रावणराव कदम	नारपोली पो.स्टे	भिवंडी शहर पो.स्टे.
६	नेताराम श्रल्हादजी मस्के	कोनगाव पो.स्टे.	विशेष शाखा
७	रमेश जनाबा पाटील	शिवाजी नगर पो.स्टे.	विशेष शाखा
८	वैशाली उमेश गोरडे	गुन्हे शाखा	वर्तकनगर पो.स्टे.
९	विजयकुमार काकासाहेब देशमुख	गुन्हे शाखा	शहर वाहतूक शाखा
१०	मंजुषा अरविंद भोंगळे	कापुरबावडी पो.स्टे.	व.पो.नि. कापुरबावडी पो.स्टे.

२. संबंधित सहायक पोलीस आयुक्त / वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी या आदेशाची प्रत उक्त नमूद पोलीस अधिकारी यांना बजावून त्यांना तात्काळ बदली ठिकाणी कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयात सादर करावा. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी/ बदलीवर येणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची वाट पाहू नये.

३. संबंधित सहायक पोलीस आयुक्त / वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी उक्त नमूद पोलीस अधिकारी यांचा अतिरीक्त कार्यभार तसेच त्यांच्याकडील प्रलंबित असलेली प्रकरणे व तपासावरील प्रलंबित असलेले गुन्हे जमा करुन घेवुन पोलीस ठाणे/ शाखेत सेवेने ज्येष्ठ असलेल्या पोलीस अधिकारी यांच्याकडे देण्याबाबत कार्यवाही करावी.

४. बदली झालेल्या संबंधित पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्या बदली ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. संबंधित सहायक पोलीस आयुक्त / वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी नमूद पोलीस अधिकारी हजर झाल्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयात तात्काळ सादर करावा.

पोलीस आस्थापना
मंडळाच्या मान्यतेने

(मिना मकवाणा) 30/6/26
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १,
पोलीस आयुक्तालय, ठाणे

प्रति,

सर्व संबंधित सहायक पोलीस आयुक्त, ठाणे
सर्व संबंधित वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणे